Cosmos Multidisciplinary Research E-Journal
Online Available at www.cmrj.in
Recognized International Peer Reviewed Journal Impact Factor 5.3 ISSN No. 2456-1665

# विद्यार्थ्यांच्या संबंधातील पालक-शिक्षक संघाच्या कार्याचा अभ्यास.

**रविंद्र भाईदास पाटील**
जिल्हा परिषद कन्या शाळा, प्रकाशा,
तालुका - शहादा, जिल्हा नंदुरबार

**प्रास्ताविक -**

गुरुकुल ही आपल्या कडील पूर्वापार पद्धत ज्यामध्ये विद्यार्थी - शिष्य हे शिकण्यासाठी आश्रमात किंवा गुरुच्या घरी जावुन तिथेच शिक्षण घेत असत. कालांतराने शिक्षण पद्धती व शिक्षण व्यवस्थेमध्ये काळानुरुप बदल होऊ लागला परंतु पाश्चात्य देशांमधील शिक्षण व्यवस्थेपेक्षा भारतीय शिक्षण व्येवस्थेमधील बदल व जागृकता दिसुन येत नाही. ती म्हणजे बालक-पालक-शिक्षक व संस्थाचालक यांच्यामधील आंतरक्रिया, समन्वय व जागृकता.

" फ्रान्स या देशातील एका छोट्याशा खेडे गावातील प्रसंग. एका प्राथमिक शाळेसमोर २० पालक आपल्या हाती घेतलेले विविध घोषवाक्यांचे फलक उंचावून निदर्शने करीत आहेत. शाळेचे मुख्याध्यापक व शिक्षक पालकांसमोर उभे आहेत. ही निदर्शने कशासाठी ? तर शाळेच्या मुख्याध्यापकांनी आपल्या अधिकारात घेतलेल्या एका चुकीच्या निर्णयासंदर्भात अशी कोणती चूक केली आहे मा. मुख्याध्यापकांनी ! इयत्ता पहिलीच्या वर्गाची प्रवेश क्षमता २० विद्यार्थी असताना मा. मुख्याध्यापकांनी २१ विद्यार्थ्यांना प्रवेश दिल्यामुळे एका विद्यार्थ्यास जादा प्रवेश दिल्यामुळे आपल्या विद्यार्थ्यांचे, मुलांचे शैक्षणिक नुकसान होणार आहे. म्हणुनच २० पालक २१ व्या विद्यार्थ्यांचा प्रवेश रद्द करावा यासाठी निदर्शने करीत आहोत." हा प्रसंग पाश्चात्य राज्यातील पालक आपल्या मुलांच्या शिक्षणाबाबत किती जागृत आहेत याची साक्ष देतो.

शिक्षक-पालक संघाची संकल्पना पाश्चात्य देशाकडुन आपल्याकडे आली आहे. अमेरिकेत १८८५ मध्ये या संकल्पनेचा उगम झाला आणि अमेरिकेतच तिचा प्रसारही झाला. अमेरिकेत प्रत्येक राज्याची PTA (Parents Teacher Association) म्हणजेच पालक-शिक्षक संघ असतो. तिथे ती पीटीए त्या त्या राज्यातील जिल्हा आणि तालुका पातळीवरील सर्व शाळातील पीटीएंची शिखर संख्या म्हणून कार्यरत असते. पुढे या संकल्पनेचा हळूहळू सगळया जगात प्रसार झाल्याचे आठळून येते. आज इंग्लंड, चिन, जपान, जर्मनी, झेकोस्लोव्हाकिया या देशांबरोबर भारतात ही पालक-शिक्षक संघाची संकल्पना मोठ्या प्रमाणावर स्वीकारली गेली आहे. याचे मुख्य कारण समाजाच्या जडण-घडणीत आणि बालकाच्या व्यक्तिमत्व विकासात त्याची असणारी उपयोगितातच होय.

आपल्याकडे १९६३ सालापासून या संदर्भात हालचाली सुरु होऊन, विचार-मंथन सुरु झाले भारतातील अनेक राज्यातील शाळाशाळांमध्ये 'पालक-शिक्षक संघ अनिवार्य झाले आहेत. महाराष्ट्र शासनाने १८ ऑक्टोबर १९९७ रोजी काढलेल्या अध्याध्येशानुसार राज्यातील प्रत्येक मान्यता प्राप्त प्राथमिक व माध्यमिक शाळेत पालक शिक्षक संघ अनिवार्य केले. परंतु आज २० वर्षांपेक्षा जास्त काळ उलटून गेल्यावरही अपेक्षित परिणाम न दिसल्यामुळे असेल, राज्य शासनाने २४ ऑगस्ट २०१० च्या अध्यादेशानंतर 'पालक-शिक्षक संघ' आवश्यक पात्रता बनला आहे. या वस्तुस्थितीचं भान राज्यातील सर्व शाळा चालकांना जितक्या लकवर येईल तीतके ते त्यांच्या शाळेच्या हिताचं ठरेल हे नक्की !

**संशोधनाची गरज -**

'पालक-शिक्षक संघ' सुरवातीला नवी कल्पना, त्यानंतर उपयुक्त साधन पुढे कधीतरी उपयुक्त पध्दत आणि आत्ता आत्तातर बऱ्याच ठिकाणी उपचार म्हणून उरलेल्या पालक-शिक्षक संघांच्या कार्यपध्दती बाबत शिक्षक पालकांनी जागृक व सक्रिय रहाणे अत्यंत गरजेचे आहे. विद्यार्थ्यांच्या किंवा पाल्याच्या सर्वांगिण विकासासाठी, आपल्या भावी पिढीच्या भल्यासाठी पालक व शिक्षक या दोघांच्या सहभागाने आणि एकमेकांच्या सहकार्याने प्रयत्न करणारी, करत रहाणारी स्थानिक संस्था म्हणजे पालक शिक्षक संघ होय. यामध्ये पालकांच्या क्षमतांचा शाळेतील गरजांचा व उपलब्ध स्त्रोतांचा सकल विचार करून त्यांचा योग्य तो समतोल व समन्वय साधला जाणे अपेक्षित आहे.

शालेय शिकणाऱ्या आपल्या पाल्यासाठी किंवा पाल्याच्या हितासाठी, प्रत्येक शाळेतील पालकांनी संघटित होणे जेव्हा स्थानिक पातळीवर घडू लागेल तेव्हा शाळाही विकासात उद्युक्त होतील, येथे पालकांची भूमिका टिकाकाराची, आपल्या शाळेत काय नाही हे दाखवून देणारी नसावी. या बरोबर शाळा व्यवस्थापनानेही पालकांना व्यवस्थापनाच्या नियोजन, संयोजन , संप्रेषण, संघटन या सारख्या सर्व टप्यावर सहभागी करून घेत आपल्या उणीवा समस्या दूर करणे शक्य आहे. परस्परांवरील विश्वास व विद्यार्थ्यांचे हित या दोन बाबींबरोबरच पालकांची जागृकता, त्यांना शासनाने दिलेले पालक-शिक्षक संघातील अधिकार हे माहित असणे आवश्यक आहे. यासाठी पुन्हा एकदा गांर्भियाने व प्रयत्न पूर्वक आप-आपल्या शाळेतील पालक शिक्षक संघ सक्रिय करणे व त्यास आदर्श करून इतरांसमोर त्याचा दाखला देणे गरजेचे ठरले आहे.

**संशोधनाची उद्दिष्टे -**

- शाळेतील पालक-शिक्षक संघाच्या सद्यस्थितीचा आढावा घेणे.
- शाळेतील पालक-शिक्षक संघाच्या माध्यमातून शैक्षणिक, शारीरिक, मानसिक व सामाजिक समस्या प्रधान विद्यार्थ्यांचा शोध घेणे.
- शाळेतील पालक-शिक्षक संघाच्या माध्यमातून कौटुंबिक समस्या प्रधान विद्यार्थ्यांचा शोध घेणे
- शाळेतील पालक-शिक्षक संघाच्या माध्यमातून विविध विषयांची जाणिव विद्यार्थ्यांमध्ये निर्माण करणे.

**संशोधनाची गृहितके -**

- पालक शिक्षक संघाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांचा विकास होऊ शकतो याची जाणीव पालक-शिक्षक संघास आहे.
- विद्यार्थ्यांच्यामध्ये येणा-या शैक्षणिक, शारीरिक, सामाजिक, मानसिक समस्यांची जाणीव पालक शिक्षक संघास आहे.

**संशोधनाची मर्यादा -**

- संशोधन हे केवळ नंदुरबार शहरापुरते मर्यादित आहे.
- इयत्ता ०७ वी चे विद्यार्थी व त्यांचे पालक व शिक्षक यांचे पुरते मर्यादित आहे.

**संशोधनाची कार्यपद्धती -**

- प्रस्तुत संशोधन वर्तमान परिस्थितीशी निगडीत असल्याने सर्वेक्षण पद्धतीचा उपयोग करण्यात आला आहे
- नमुना निवड करताना संभाव्यता (Probability) नमुना निवड व गैर संभाव्यता (non-Probability) नमुना निवड या दोन प्रकारापैकी गैरसंभाव्यता प्रकारापैकी सहहेतुक किंवा उद्‌देशपूर्ण नमुना (purposive sampling) पद्धतीने नमुना निवड करण्यात आली.

**संशोधनाची साधने -**

- प्रश्नावली व मुलाखती या साधनांच्या सहाय्याने माहिती संकलन करण्यात आली.
- तज्ज्ञ मार्गदर्शकाकडून प्रश्नावली व मुलाखत प्रश्नावली तपासून घेण्यात आली.
- प्रश्नावली मधून मिळालेल्या प्रतिसादाची टक्केवारी काढून विश्लेषण तयार करणे.

**संशोधन सामुग्रीचे विश्लेषण -**

**चाचणी - १**

**उद्दिष्ट्ये - पालक शिक्षक संघाच्या सद्यस्थितीचा आढावा**

| अ.क्र | संशोधनाचे मुद्दे | प्रतिसाद टक्केवारी | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | पालक | शिक्षक | मुख्याध्यापक | विद्यार्थी |
| १. | पालक- शिक्षक संघ स्थापना | १०० | १०० | १०० | १०० |
| २. | वर्षभरातुन किमान ४ बैठका होतात | १०० | १०० | १०० | १०० |
| ३. | पालकांचा प्रतिसाद व उपस्थिती | ९९ | १०० | १०० | ९९ |
| ४. | नियोजन व अहवाल लेखन | ९० | १०० | १०० | ९० |
| ५ | विविध समस्यांवर चर्चा | ९५ | १०० | १०० | ९५ |
| ६ | विविध विषयांवर चर्चा | ९७ | ९९ | ९९ | ९७ |

**संशोधनाचा सारांश**

- पाल्याला शिक्षण घेता यावे म्हणून पालक शिक्षण घेता यावे म्हणून प्रयत्नशील दिसून येतात. या प्रयत्नात सुजाण व सुशिक्षित पालकांची संख्या मोठ्या प्रमाणावर आढळुन आली. शाळेचे मध्यवर्ती ठिकाण, शाळेतील शैक्षणिक वातावरण तेथील सोयी सुविधा प्रशिक्षित व तज्ञ शिक्षक, भौतिक परिसर यांचे सूक्ष्म निरीक्षण करणारा पालक वर्ग दिसून आला.
- विद्यार्थ्यांच्या पालकांची पालक-शिक्षक सभेसाठी १००% उपस्थिती आढळुन आली. संशोधकाने एका इंग्रजी माध्यमाच्या शाळेतील इयत्ता १० वीच्या वर्गातील पालक-शिक्षक सभेतील वस्तुस्थिती जाणून घेतली असता, शिक्षकांचे अभ्यासपूर्ण मार्गदर्शन, समंत्रकांचे व

तज्ञ समुपदेशकांचे बालक व पालकांना समुपदेशन आणि पालकांचा सक्रिय सहभाग आढळुन आला.

- शाळांमध्ये संगणक कक्ष व संगणक तज्ञ अध्ययावत दिसून आले. संगणक हे यंत्र विद्यार्थ्यांच्या सर्रास वापरात येत आहे. रेडिओ, फ्रिज, नर्शिंग मशिन या यंत्रांच्या बरोबरीने नव्हे तर आधी संगणक घरी आणला नाही तर आपण संगणक निरीक्षर अशी परिस्थिती होईल. इतर कशा करिता असो वा नसो पण २१ व्या संगणक युगात संगणक वापरासाठीका होईना प्राथमिक स्वरूपाचे इंग्रजी आज गरजेचे झाले आहे.
- विद्यालयीन शिक्षणाचे माध्यमिक व महाविद्यालयीन असे दोन स्तर आहेत. यो दोन्ही स्तरावर मराठी माध्यमाच्या जोडीने इंग्रजीची गरज पूर्वी होती. आज तर ती गरज वाढलीच आहे. असे मला वाटते.
- महाविद्यालयाच्या स्तरावर आज सर्वच विषय इंग्रजीतून शिकवले जातात व उद्याही इंग्रजीतूनच शिकवले जाणार कारण महाविद्यालयाच्या पातळीवरचे विषय समजून देणारी पाठ्यपुस्तंक , संदर्भग्रंथ हे इंग्रजी भाषेत आहेत मराठीत नाहीत यासाठी गणितशास्त्रे हे विषय माध्यमिक शाळेपासूनच इंग्रजीत शिकविणे सोयीचे ठरणारे आहेत.
- पालक शिक्षक संघाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण व्यक्तिमत्वाच्या विकासाबरोबरच शाळेची गुणवत्ता वाढविणे, शाळेच्या प्रगतीच्या ध्यास घेवून कार्यक्रमाचे आयोजन व नियोजनबद्ध अंमलबजावणी झाली तर शिक्षणातून अपेक्षित सुसंस्कारित विद्यार्थी घडू शकतील. व पालक, शिक्षक संघाचे कार्य मोलाचे ठरेल. म्हणूनच शाळा व संस्थेशी निगडित असलेले बालक, पालक, संचालक व शिक्षक, समाज आणि शासन या महत्वपूर्ण घटकांच्या परस्पर सहकार्यातून शिक्षण प्रकिया निर्व्यंग, निकोप व सुंदर होऊ शकतो. यासाठी गरज आहे. 'पालक शिक्षक संघा' ची.

**निष्कर्ष -**

- शाळांमध्ये पालक शिक्षक संघाची स्थापना झाली आहे. यासाठी सर्वांचे होकारार्थी १०० टक्के समान प्रतिसाद मिळाला.
- वर्षभरातुन किमान ४ बैठका घेतल्या जातात ? या प्रश्नास पालक १००% व विद्यार्थी १००% असा प्रतिसाद मिळाला. वर्षातुन चार पेक्षा जास्त बैठका घेतल्या जातात.
- पालक-शिक्षक संघाच्या संदर्भातील अहवाल लेखन केले जाते. या विषयी पालक ९०% व विद्यार्थी ९०% माहिती आहे.
- पालकांची उपस्थिती किती प्रमाणात आहे. या विषयी विद्यार्थी व पालक यांच्यामते ९९% पालक या बैठकाना उपस्थित राहतात. तर शिक्षक व मुख्याध्यापक मते ९९% पालक उपस्थित असतात.
- ९५% पालकांच्या व ९५% विद्यार्थ्यांच्या मते पालक शिक्षक संघाच्या बैठकांमध्ये विद्यार्थ्यांच्या समस्यांवर चर्चा होते. यामध्ये २०% पालक व १० % विद्यार्थी यांचे याबाबत नकारार्थी मत दिसुन येते.

- शिक्षक पालक संघाच्या माध्यमातून ३% पालक व विद्यार्थ्यांच्या मते नविन विषयांवर चर्चा होत नाही तर २% शिक्षक व मुख्याध्यापकांचे मत ही नकारार्थी दिसून येते.
- 

**शिफारशी -**

- पालक - शिक्षक संघ हा विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकासासाठी तयार झालेला आहे. याची जाणीव जन माणंसात अधिक प्रखरतेने करता येईल.
- विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक, शारिरीक, सामाजिक, मानसिक समस्या शिक्षकांच्या मदतीने सोडविणे शक्य होते. यासाठी अधिक प्रभावी कार्य पालक - शिक्षक संघ करु शकतो.
- पालक-शिक्षक संघाने विद्यार्थी, पालक व शिक्षक या सर्वांसाठी पालकांची शाळा, तज्ञांचे मार्गदर्शन शिबीर, कार्यशाळा, कृतिसत्रे आयोजित केल्यास पालकांचे उद्‍बोधन होईल.
- विद्यार्थ्यांसाठी भविष्यात उपयोगि असतील अशा विविध विषयांचे मार्गदर्शन करावे.

**संदर्भ ग्रंथ -**

१. साने गुरूजी (२००८) ' माझ्या मनातील शाळा ' : जळगांव : दीपस्तंभ प्रकाशन.
२. आगलावे प्रदिप (२०००) 'संशोधन पद्धती शास्त्र व तंत्रे' नागपूरः विद्या प्रकाशन .
३. कुंडले म. वा. (१९९३) 'शैक्षणिक तत्वज्ञान व समाज शास्त्र' पुणेः नुतन प्रकाशन.
४. किशोर चव्हाण (२०१३) 'शिक्षण तरंग' नाशिकः इनसाईट पब्लिकेशन.
५. बाबा नंदनपवार (२००१) 'मुलांना घर द्या एक घर' नागपूरः मानकर, शैक्षणिक विकास व सेवा प्रतिष्ठान, .
६. बाबा नंदनपवार (२००१) 'शिक्षणसमीक्षा' नागपूरः
७. बाबा नंदनपवार (२००९) 'शिक्षणसमीक्षा' नागपूरः
८. भारतीय शिक्षण (२०१०) मुंबईः महाराष्ट्र भारतीय शिक्षण मंडळ.
९. महाराष्ट्र शासन शालेय शिक्षण विभाग, मुंबई (१९९७) शासकिय आदेश
१०. महाराष्ट्र शासन शालेय शिक्षण विभाग, मुंबई (२०००) शासकिय आदेश
११. क्षमताधिष्ठीत अभ्यासक्रम माहिती पुस्तिका बाबत बाबा नंदनपवार (इंग्रजी)
१२. Best J.W. (१९८३) Research in Education: New Delhi IV Edition, Prentice Hall,India Pvt.Ltd.
१३. Parent- Teacher Association (२००८) New Delhi. Common wealth publication.